# SUCCESS STORIES

**MANISH G. DABHOLKAR**

गौड ब्राह्मण सभा ही आपली संस्था गेली शतकाहून अधिक काळापासून कु.दे.गो.ब्रा. ज्ञातीच्या हितासाठी विकासासाठी विवीध उपक्रम राबवीत असते. त्यांची विस्तृत माहीती आम्ही त्रैमासिकात सादर करतोच. परंतु तरुण मुलाना त्यांच्या पालकाना डोळ्यासमोर ठेऊन आम्ही **SUCCESS STORIES** हे सदर चालू केले आहे. ज्ञातीतील तरुणानी केवळ नोकरीचा मार्गच न स्वीकारता सुद्धा स्वत:ची सर्वांगीण प्रगती कशी साध्य केली. त्याचा लेखाजोखा संपूर्ण भारतातून व विदेशातून सुद्धा संर्पका द्वारे, समाज माध्यमातून व वेळप्रसंगी दौरे करुन मिळंवीत असतो. कला कौशल्याच्या माध्यमातून विकास, धंदा, व्यवसाय करत न मळलेल्या वाटेवर चालुन स्वत:चे व्यक्तीमत्व कसे घडवावे यांचा परिचय **SUCCESS STORIES** या सदरात होतो.

अशीच एक आगळी वेगळी **Success Story** आज आपल्या समोर ठेवताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. जो मुलगा १०वी नापास ............ पुढे कर्मशीयल आर्ट मध्ये डिझायनर्स झाला.. त्याच कॉलेजात विजीटींग फॅकल्टी म्हणून सध्या शिकवतो... परंतु आज सुप्रसीद्ध नेपथ्यकार म्हणून ज्यांचा संपूर्ण महाराष्ट्र आणि भारताने गौरव केला आहे. ज्याने ''जाणता राजा'' हे भव्यदीव्य नाटक लंडनला नेले.. कोडमत्र'' नाटकाला नेपथ्यकार म्हणून महाराष्ट्र शासन व **Zee** गौरव पुरस्काराने सन्मानीत केले गेले. अशा एका धाडसी व कत्तुर्त्ववान तरुण म्हणजेच सुप्रसिद्ध नेपथ्यकार प्रसाद वालावलकर'' यांचा आजपर्यंतचा जीवन प्रवासाचा आढावा घेणारा हा लेख.

**मनीष गुरुदास दोभोलकर**

**आपले बालकण व शिक्षण या विषयी काय सांगाल?**



**प्रसाद वालावलकर**

माझा जन्मू मुंबईतील गोरेगाव अशा लहानश्या गावात झाला. मी वर्षातून सात वेळा मालवणला जातो. माझ्या जन्माच्या वेळी आमच्या घरची परिस्थिती बेताची होती. माझे बाबा अंनत शंकर वालावलकर हे प्रचंड धावपळ व मेहनत करायचे. मी ज्यावेळी शाळेतून घरी यायचो त्यावेळी बाबा कामावर जायचे. आणि मी झोपायचो त्यावेळी ते घरी यायचे. आमची भेट कमीच व्हायची. पण बाबांचे घरावर पूर्ण लक्ष आसायचे त्यावेळीपासून हीच शिकवण आम्हाला मिळाली. माझ्या पेक्षा दोन मोठ्या बहीणी परतु आम्हा तिघानाही आई-बाबांनी फार कष्ट करून वाढविले. माझे शिक्षण सन्मित्र मंडळ अ.भि. गोरेगावकर या शाळेत झाले. मी शाळेत मस्तीखोर होतो. जास्त बोलायचो नाही. पण मस्ती खूप करायचो. माझे शिक्षण मराठी मिडीयम मधून झाले. शाळेच्या ग्राऊंडवर सारखे क्रिकेट खेळायचो मोठे होऊन सुनील गावस्कर व्हायचे होते. ग्राऊंडवरचे चेंडू जेव्हा पेपर मध्ये दिसायला लागले. तेव्हा खेळ थोडा कमी करावा लागला. व अभ्यासात लक्ष दे असा ओरडा बसत होता. तरी लक्ष हे हस्तकला, गणपती डेकोरेशन, खेळणे यामध्येच अडकून होते. अभ्यासात लक्ष काही लागत नव्हते. दहावी आली तरी, माझे लक्ष नाही हे आई-बाबींच्या लक्षात आले. त्यांनी चांगल्या क्लासला पाठवून माझ्यावर खूप मेहनत घेतली. अभ्यास पुढे किती महत्वाचा असतो हे त्यावेळी माहीतच नव्हते. त्यावेळी खूप शाळा नव्हत्या. रिर्झल्टचा दिवस आला. आणि मी दहावीला नापास झालो. आजुबाजुचे मित्र खूप हसले. जे मित्र रोज खेळायला बोलवायचे तेच मित्र हसत होते. खूप वाईट वाटले. खूप रडलो मी. त्यावेळी निश्‍चय केला आई-बाबांची मान आपल्यामुळे कधीही खाली जाता कामा नये स्वत:च्या मुलाचे थोडे तरी नुकसान झाले की आई-वडीलांना किती वाईट वाटते हे मला स्वत:वडील झाल्यावर कळले. आई-बाबा जे अभ्यास कर म्हणून सांगायचे ते त्यावेळी किती बरोबर होते हे मला कळले. त्यावेळी लोकांचे घरातल्यांचे काही कटू शब्द मागून माझ्या कानावर पडायचे त्यावेळी मी शीकलो अभ्यासात नीट लक्ष दिला असता तर बरे झाले असते. पण ती वेळ निघून गेलेली होती. या सगळ्यात आईने मला खूप संभाळले आपण बघीतलेली स्वप्ने, आशा पूर्ण करायची

ताकद आईने दिली. अशा वेळी आपल्या आई-वडिलांनी केलेली पूण्ये आपल्या कामाला येतात. माझा तर या गोष्टीवर ठाम विश्वास आहे. त्यांच्याच पुण्याईमुळे मी नावलोकीक मिळवू शकलो.

**कमर्शिअल आर्ट शिक्षण कसे पूर्ण केले?**

माझे कॉलेज रेहेजा स्कुल ऑफ आर्किटेक्चर तिथे मी शिकलो माझी मोठी बहीण अरुणा वाावलकर (स्नेहा गवाणकर) हिला ही याच कॉलेजला कर्मशिअल आर्ट कॉलेजला शिकायचे होते. तीला त्यात ॲडमिनीशन मिळाले होते पण त्यावेळी फि भरायला आमच्याकडे पैसे ही नव्हते. ही गोष्ट तिच्या मनात खूप वर्ष होती तीने ठरवीले होते की प्रसादला डिझायनर्स बनवायचे तिने केलेल्या धावपळीमुळे मला त्याच कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळाले. डिसाइन हा माझा आवडता विषय असल्यामुळे अभ्यासात लक्ष्य निट लागत होते. ते शिक्षण मी मनाने व आवडीने करायचो. चांगल्या मार्क ने पासही झालो. (सगळे विषय आवडीचे असल्यामुळे) आता त्याचा कॉलेजमध्ये व्हिजीटींग फॅकल्टी म्हणून दोन विषय शिकवितो.

ताई पेक्षा छोटी बहीण अंजली वालावलकर (अंजली नाईक) ताईच्या लग्नानंतर हीच माझा अभ्यास घ्यायची. इंग्लीश ग्रामर हीनेच मला शिकवल. अभ्यास, कॉलेज, चालु होते. अभ्यासात आवड लागत होती. या शिक्षणात पुढे खूप शाखा आहेत हे मला त्यावेळी लक्षात आल. आणि तोच माझा पूर्नजन्म ठरला. मग मी मागे बघीतले नाही. कॉलेज संपल्यावर नोकरी करायची पैसे कमवायचे म्हणून बाहेर पडलो. चार-पाच दिवस खूप इंटरव्युव दिले पण नोकरी काही मिळत नव्हती. म्हणून बाबांच्या ऑफिसला जायला लागलो त्यावेळी व्यवहार ज्ञान नव्हते त्यावेळी खूप जण म्हणाले की यात खूप धावपळ आहे तुला नाही जमणार जे आपल्याकडून नाही होणार असे जेव्हा दुसऱ्यांकडून समजते. तीच गोष्ट पूर्ण करून दाखवायला मजा येते आणि मी ते करून दाखवितो. व्यवहार ज्ञान समजून घेण्यासाठी मी बाहेर पडलो. करीरोड, वाशी, कल्याण, भिवडी, चर्चगेट, इतर खूप ठिकाणी कामे केली. सकाळी ७.०० वाजता घर सोडयचो रात्री येई पर्यंत उशीर व्हायचा. या सकाळ ते रात्रीच्या प्रवासाने मला खूप काही शिकविले आणि मी कामात तरबेज झालो आणि मग बाबांना परत जॉईंट झालो.

**व्यवसायात कसे पडलात? आवड हो ती की कोणाच्या मार्गदर्शनामुळे का तुमचे वडील प्रतीथयश नेपथ्यकार आहेतच त्यांचाच वारसा पुढे न्यावासा वाटला म्हणून?**

माझी आवड चांगले काम शिकणे, चांगल्या गोष्टी शिकणे, चांगल्या लोकांशी संवाद करणे, चांगल्या लोकांमध्ये राहणे यात मी वाढलो तो पर्यंत बाबा मेहनत करून खूप मोठे झाले होते. आमची परिस्थितीही सुधारली होती आम्ही चाळीतून बिल्डींगमध्ये राहायला आलो होतो. घरी गाडी आली. हि फक्त आई- बाबांची मेहनत. खूपसे वायफळ खर्च न करता जमविलेले हे सुख होते. हेच मी शिकत आलो. मी माझ्या वडीलांची मेहनत बघून या व्यवसायात यायचे ठरविले हा व्यवसाय बाहेरून दिसायला सोपा पण आतून खूप कठीण. माझ्या बाबांनी या इंडस्ट्रीमध्ये खूप नाव कमविले आहे. ते नाव तेवढेच सांभाळले पाहीजे हीच बाबांची शिकवण. आणि तेच मी अमलात आणले. शिक्षण झाल्यामुळे मला या व्यवसायात काम करणे सोपे होऊ लागले. डिसाइनचे काही प्रश्न मी सोडवू लागलो त्यामुळे त्याचा फायदा व्यवसायात होऊ लागला.

बाबा नाटक इंडस्ट्रीमध्ये असले तरी मी पुढची वाटचाल करायचे ठरविले. अजुन वेगळे काही तरी करायचे हे

डोक्यात असायचे त्याला नशिबाची व नारायणाची साथ मिळाली. मी इवेंट डिझाईन क्युशुबुशन डिझाईन, ॲड फिल्म्स मालिका शुट (सिरीअल), फोटो शुट, लग्न, संगित सेटअप बरीच कामे करू लागलो. असा माझा पुढचा प्रवास सुरु झाला. या सगळ्यामध्ये आपल्याकडे वेगवेगळ्या क्षेत्रातील ज्ञान असल्यामुळे व तरबेज झाल्यामुळे व आई-बाबांच्या आशिर्वादामुळे इंडस्ट्रीमध्ये कामाची कधीच कमी पडत नाही हे सगळे करता करता २० वर्षे कधी निघून गेली कळलेच नाही. चांगली उच्च दर्जाची काम करायला प्रवृत्त करायला काही कटू अनुभव मनात घर करून गेले.

**नाट्य क्षेत्रात आपण नेपथ्यकार म्हणून कसे पर्दापण केलात? आपल्या पहिल्याच अनुभवा विषयी आपण काय सांगाल.**

माझ्या आयुष्यात जेव्हा पहिल्या नाटकाचे डीझाईन करायचे काम माझ्यावर सोपविले त्यावेळी मी दीलीप कोल्हटकर, विक्रम गोखले व लता नार्वेकर यांना भेटायला गेलो भेटल्यावर मला बाहेर बस असे सांगण्यात आले. मी एक तास बाहेर बसलो होतो. त्यावेळी कानावर असे शब्द पडले की हा बच्चा मुलगा आपली वाट लावेल याला एवढे मोठे स्टार कास्ट असलेले नाटक आपण का देतो. हे ऐकल्यावर माझा आत्मविश्वास मागे घेण्यासाठी हे वाक्य खूप होते. पण हे वाक्य मला काही शिकवून गेले. मी खूप मेहनत घेवून या प्रोजेक्टवर काम केले. त्या वर्षातील पाच बक्षीसे माझ्या नावावर जाहीर झाली. हीच मला मिळालेली पोचपावती होती आज दिलीप कोल्हटकर माझे खूप छान मित्र आहेत ते पुण्यात राहतात. माझे काम बघून नेहमी मदत करतात. भेटायला येतात. त्यांना ही गोष्ट आठवतही नसेल पण माझ्या मनात ते शब्द घर करून गेले. आणि यामुळेच मी जिद्दीने चांगला डिझायनर्स झालो.

**''जाणता राजा'' हे नाटक अखंड महाराष्ट्राचे मानबिंदू ठरले.. शेकडो कलाकार, हत्ती, घोडे, पालख्या इत्यादी समुहासह हेच नाटक लंडनच्या भूमीवर केलात त्याबद्दल काय सांगाल?**

माझ्या चांगल व लक्षात राहील असा अनुभव म्हणजे ''जाणता राजा'' लंडन दौरा. माझे सेटखूपदा इंडियन कंट्रीच्या बाहेर गेले आहेत. पण जाणता राजासारखा मोठा सेट १८० कलाकारांसोबत साता समुद्रापार घेवून जायची हिंमत मी केली. फार मोठी रिस्क होती आई-बाबांचे आशिर्वाद व बायकोचे पाठबळ (श्रद्धा बालावलकर) सदैव मागे असल्यामुळे हे होऊ शकले. मुळाचा सेट खूप मोठा असल्यामुळे एवढे सामान परदेशी घेवून जाणे शक्य होत नव्हते. म्हणून परदेशी 'जाणता राजाचे' प्रयोग होत नसत. नंतर हा प्रोजेक्ट माझ्या जवळ आला. ३-४ महीने मिटींग करून टेकनिकल डीझायन तयार झाले. हळुहळु सेट बनवायचे युद्ध पातळीवर सुरु झाले. सेट बघायला खूप न्यूज (News) चॅनलस येत होती. सेट बनविताना खूप अडचणीही येत होत्या. पण माझे सगळे सवंगडी व मी यावर मात करून पुढे जात होतो. सेट पूर्ण झाला की नाही हे लंडन यायच्या आधी बघायचे होते. वाशीला मोठ्या स्टुडीओ मध्ये एका सकाळी हा पूर्ण सेट लावून बघीतला. बाबासाहेब पुरंदरेचे आगमन ज्यावेळी झाले त्यावेळी एक वेगळी उर्जा अंगात आली. ती बाबासाहेबांची पाठीवर पडलेली शाबासकी अजुनही आठवते. त्यामुळे अंगात अजून हुरुप आला. त्यांना माझे काम खूप आवडले. खूप छान बोलले त्यांनी सेटवर आम्हाला परदेशी दौऱ्यासाठी शुभेच्छा ही दिल्या. परक्या देशात जाऊन एवढा मोठा सेट उभा करणे वा काय मजा होती ती वेगळ्या देशात काम करायची उर्जाच वेगळी असते. एवढ्या लोकांसमोर (साता समुद्रा पार) आपल नाव घेतले जाते यापेक्षा मोठी गोष्ट ती काय. माझे पूर्ण कुटुंब तिथे पाहीजे होते असे सारखे वाटत होते. माझा आनंद गगनात मावत नव्हता. लंडन मध्ये कामाची खूप प्रशंसा झाली. मा. नरेंद्र मोदीकंडून कामाची प्रशंसा झाली मोदी साहेबांबरोबर दोन मिनीटे बोलायची संधी मिळाली.

**आज नाटक क्षेत्रात ''कोड मंत्र'' या नाटकाने हाहाकार उडविला आहे. सर्व रेकॉर्ड मोडत सर्वच पारितोषीके मिळवत हे नाटक घोड दौड करीत आहे. आपण रणभूमी, युद्ध प्रसंग, सैनिक छावण्या हुबेहुब उभ्या केल्या आहेत. त्यासाठी आपणास अनेक पुरस्कारही मिळाले आहे. त्याबद्दल थोडक्यात काय सांगाल?**

याच माझ्या कामामुळे गुजराती व मराठी इंस्टट्रीमध्ये कोड मंत्र हे नाटक मिळाले. या नाटकाचे डिमांड खूप वेग-वेगळे होते. ते मी पूर्ण केले. सेटवर एकाच वेळी ५०-५२

कलाकार एकाच वेळी धावणार, चालणार, युद्ध करणार ही कल्पनाच वेगळी होती ही जबाबदारी माझ्यावर टाकण्यात आली. या नाटकाच्या मिटींग दोन महिने चालल्या, खूप मेहनत घेतली. आणि त्या मेहनतीचे चीज झाले. पडदा उघडताच समोर कारगिलची युद्धभूमी बघून प्रेक्षकांच्या टाळ्या ऐकून आनंदाश्रू आले. यासाठी यावर्षी मला 'मटा सन्मान २०१७'' बेस्ट डिझाईन संस्कृतीक कला दर्पण २०१७ बेस्ट डिसाईन, महाराष्ट्र शासन २०१७ बेस्ट डिसाईन असे पुरस्कार नावावर कोरले गेले.

**चंदेरी दुनियेतुन तुम्ही कसे काय बाहेर पडता? कुटुंबाला वेळ देऊ शकता की कसे?**

जेव्हा आपल्या मनाला आवडणारे काम करायला मिळते तेव्हा आपण वेळ काळ बघत नाही. आमची इंडस्ट्रीज जास्तीत-जास्त कार्यरत असते. मिटींग, शुट, पण आपण आपल्यासाठी, घरच्यासाठी किती वेळ ध्यायचा यावर आपला ताबा पाहीजे. काम असले की मी शनिवार रविवार ही बघत नाही. पण घरच्याना वेळ हवा असेल तर सुट्टी घेणे थोडे कठीण पण आधीच व्यवस्थीत प्लॉन केले व समजूत दिली की सोपे जाते.

आपल्या इंटस्ट्रीमध्ये रोज खुप पार्टीच होत असतात. पण चांगले व जास्त काम करायचे असेत तर आपल्याला इतर छंदांवरती ताबा ठेवावा लागतो. हे बाबांचे शब्द माझ्या कानात घुमत असतात. आई-वडील, श्रद्धा तिर्थ यांचे विचार डोक्यात असल्यामुळे घरी लवकर जायची ओढ नेहमीच असते. आमची दुनिया चंदेरी आहे. खुप झगमगाट असतो या झगमगाटात आपण कुठे हरवून जाऊ हे कधी कळणारही नाही. म्हणून स्वत:वर आपला ताबा असायला हवा. माझा तरुण मुलांना सांगायचे आहे की कधीच आपले मित्र आपल्याला वाईट सवयी लावूच शकत नाही आपला स्वत:चा ताबा स्वत:वर असावा लागतो.

तसेच माझे ही खूप मित्र आहेत (वेगवेगळ्या क्षेत्रातील) मी रोज सकाळी व्यायामला जीममध्ये जातो छान व्यायाम करतो. ३० जणांचा मोठा ग्रुप आहे. सगळ्यांना भेटणे, हसवणे सुख-दु:खात उभे राहणे यासाठी वेळ काढणे थोडे कठीण असते पण वेळ काढावाच लागतो तसेच निवडणुकीच्या प्रचारसभा सुद्धी घेतो वाडीमध्ये फिरतो, बुथवर उभा राहतो. आपण समाजाला काही देणे लागतो. त्यासाठी हा माझा छोटा प्रयत्न.

**तुमचे लव्ह-मॅरेज की अरेंज? तुम्ही तुमची जोडीदारीण कशी निवडलात त्याबद्दल थोडक्यात काय सांगाल?**

माझे मन क्रियेटिव्ह असल्यामुळे मी सुंदर गोष्टी शोधत असतो त्यावेळी मला क्रियेटिव्ह मन असलेली श्रद्धा मिळाली माझे लव्ह मॅरेज झाले. घरातून थोडा विरोध पण आपला मुलगा काही चुकीचे करणार नाही हा आई-वडिल व बहीणींचा व माझ्या दोन भाऊजींचा ठाम विश्वास या विश्वासामुळेच माझे लग्न झाले आमचे बाबा थोडे कडक स्वभावाचे माझ्या बाबांना लग्नासाठी मी चार पानी पत्र लिहीले. बाबांना पटविणे थोडे कठीण होते पण पत्र थोडे सॉलीड लिहील्यामुळे व श्रद्धाला भेटल्यामुळे लग्नाला होकार मिळाला. यातून मी एक शिकलो. समोरच्याला नीट समजवल्यावर विश्वास दाखवील्यावर तो माणूस (व्यक्ती) तयार होते. याचा उपयोग मला व्यवसायातहि झाला. १६ वर्षे कशी गेली कळलीच नाही गेल्या जन्मात जी काही पूण्य केली त्याचे फळ मी समजतो आम्हाला छानसा मुगला (तिर्थ) माझे नाव प्रसाद, मुलगा तिर्थ, आणि बायको श्रद्धा पूर्ण देऊळच आमच्या घरात असते.

**आपण एका वेगळ्या वाटेवर जाऊन प्रतिथयश संपादन केलात व एक वेगळा आदर्श तरूणांपुढे ठेवलात त्याबद्दल भावि पीढीला आपण काय संदेश ध्याल?**

कुडाळ देशकर गो.ब्रा. अंकासाठी लिहीण्याची माझी ही दुसरी वेळ. मनीष दाभोलकर यांनी ही जी नवीन कल्पना आणली आहे ती फार कौतुकास्पद आहे. त्याचे आभार मानावेत तेवढे कमी. यामुळे काही तरुण मुला-मुलींना आदर्श मिळतात व आपल्या प्रवासात न खचता पुढे कसे चालत राहावे व आपल्या आयुष्यासाठी आपले शिखर कसे तयार करावे हे सोपे जाते.

मराठी रंगभूमिवर एक सिद्ध-हस्त नेपथ्यकार म्हणून नावारुपाला आलेल्या व अनेक पुरस्कार व मान सन्मान मिळवणाऱ्या प्रसाद वालावलकर यांना गौड ब्राह्मण सभे तर्फे पुढील वाटचालीसाठी लाख-लाख शुभेच्छा!

**मनीष गु. दाभोलकर**
manish_dab@hotmail.com